**महाराष्ट्र शासन**
**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग**
**मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, नाशिक रोड - 422101**
दूरध्वनी क्र. : 0253-2461439 Email : dycomplan.nashik@maharashtra.gov.in
विभागाचे नाव : नियोजन शाखा संकलन : कुंभमेळा

प्रती,

मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक

**विषय:** दिनांक 24, डिसेंबर 2024 रोजी मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, सिंहस्थ कुंभमेळा सन 2027 बाबत जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दिनांक 24, डिसेंबर 2024 रोजी मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करणात आले होते.

सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत पाठविण्यात येत असून मा. विभागीय आयुक्त महोदय यांचे सूचनेनुसार सदर इतिवृत्त आपले कार्यालयाचे स्तरावर सर्व विभागांना निर्गमित करण्यात यावे. तसेच इतिवृत्तात नमूद केल्याप्रमाणे त्या-त्या विभागाशी संबंधित असलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करून त्याचा अनुपालन अहवाल या कार्यालयास पाठविण्यात यावा, ही विनंती.

आपला,

Signed by Yogendra Ashok Chaudhari
Date: 29-12-2024 20:36:24

**(योगेंद्र चौधरी)**
उप आयुक्त (नियोजन),
नाशिक विभाग, नाशिक

सोबत: वरीलप्रमाणे

जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिकच्या बैठकीचे इतिवृत्त. दिनांक- 24, डिसेंबर 2024, वेळ सायंकाळी 05:00 वाजता

स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

बैठकीचे अध्यक्ष- डॉ. प्रवीण गेडाम, विभागीय आयुक्त, नाशिक

बैठकीच्या सुरुवातीला श्री. जलज शर्मा, जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती, नाशिक विभाग, नाशिक यांनी बैठकीच्या विषयांची पार्श्वभूमी विषद केली. सदर बैठकीदरम्यान विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. त्यातील प्रमुख मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | बैठकीत दिलेल्या सूचना | कार्यवाही करणारे विभाग |
|---|---|---|
| 01 | सर्व विभागांनी इतर विभागाच्या कुंभमेळ्याशी संबंधित असलेल्या कामांची माहिती/ ओळख करुन घ्यावी जेणेकरुन कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी सर्व विभागांमध्ये सुसुत्रता येईल. यापूर्वीच्या बैठकीत सांगितल्याप्रमाणे सर्व अस्तित्वातील आणि प्रस्तावित पायाभूत सुविधा आणि इतर कामांची माहिती GIS पोर्टलवर उपलब्ध करून द्यावी, आणि त्यानुसार सर्व विभागांनी इतर विभागांच्या कामाबाबत स्वत:ला अवगत करून घ्यावे. यापूर्वी याकामी नाशिक मनपाने पुढाकार घेण्याचे आदेशित केले होते. तथापि, NMSCDCL कडे देखील अशीच यंत्रणा असल्याचे निदर्शनास आले आहे. उपविभागीय अधिकारी (SDM), इगतपुरी-त्र्यंबकेश्वर आणि नाशिक या दोन्ही अधिकाऱ्यांनी नाशिक मनपा आणि NMSCDCL च्या अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करून यांची यंत्रणा पाहून त्वरित GIS platform निश्चित करावा व त्यानंतर कामकाजास सुरुवात करावी. याबद्दलचे आवश्यक मनुष्यबळ आणि संसाधने नाशिक मनपा आणि NMSCDCL यांनी पुरवावे. | सर्व विभाग |
| 02 | कामाच्या नियोजनात निधीच्या बचतीबाबत विविध सूचना देण्यात आलेल्या आहेत. निधीची बचत कशी होईल याचे सर्व विभागांनी संपूर्ण नियोजन काळजीपूर्वक करावे. याबाबत विविध कामांचे उदाहरण वेळोवेळी देण्यात आलेले आहेत.<br>उदा.- CCTV आणि Public Address System या यंत्रणा एकापेक्षा अधिक विभाग वापरतात. त्यामळे या नियोजनात याचा | नाशिक महानगरपालिका, NMSCDCL, नाशिक शहर पोलीस व नप त्र्यंबकेश्वर |

| अ.क्र. | बैठकीत दिलेल्या सूचना | कार्यवाही करणारे विभाग |
|---|---|---|
| | overlap होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत यापूर्वीच सूचित करण्यात आलेले आहे.<br>बऱ्याचदा विशिष्ट output/ outcome हे वेगवेगळ्या तंत्रज्ञानामुळे/ उपाययोजनांमुळे मिळू शकते अशा वेळी output/ outcome मध्ये विशेष तफावत नसल्यास कमी खर्चाचा पर्याय वापरावा.<br>उदा.- शेजारीच विद्युत पुरवठा उपलब्ध असल्यास सोलर पॅनेल आधारित CCTV कॅमेरे न लावता थेट विद्युत पुरवठा घेतल्यास सोलर पॅनेलच्या खर्चाची बचत होईल. (मोठ्या प्रमाणावर सोलर प्रणालीमध्ये भांडवली गुंतवणूक करून पर्यावरणपूरक, कमी खर्चाची आणि economies of scale द्वारे विद्युत निर्मिती करणे हा वेगळा विषय आहे). विद्युत पुरवठा उपलब्ध नसल्यास अर्थातच अशी सोलर प्रणाली वापरता येईल. त्याचप्रमाणे शेजारीच भूमिगत गटार उपलब्ध असल्यास त्याठिकाणी स्वत:ची वेगळी मलजलशुद्धीकरण प्रणाली असलेली शौचालये लावण्यापेक्षा अशा शौचालयांना थेट भूमिगत गटारींना जोडून त्याचा निधी वाचवण्यात यावा.<br>एका रस्त्याच्या छोट्या सेगमेंटमध्ये इतर चौक नसल्यास, तितकासा अतिरिक्त उपयोग (incremental benefit) न देणारे CCTV कॅमेरे देखील कमी करता येतील.<br>CCTV कॅमेराद्वारे प्राप्त होणाऱ्या video feed चे analysis करण्यासाठीचे सॉफ्टवेअर NMSCDCL च्या यंत्रणेच्या कार्यक्षेत्रामध्ये (scope of work) असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय इतरही अनेक प्रकारच्या analytics च्या सुविधा उपलब्ध होऊ शकतात. त्यांची यादी NMSCDCL च्या अधिकाऱ्यांनी इतर विभागांना दाखविली आहे. त्यातील आवश्यक analytical features कोणते याची माहिती नाशिक शहर पोलीस, ग्रामीण पोलीस, नाशिक मनपा, विशेषतः अग्निशमन दल, आपत्कालीन विभाग आणि त्र्यंबकेश्वर नपा यांनी NMSCDCL ला द्यावी. आणि तशी सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी विविध खर्चाचे पर्याय प्रस्तावित करावेत. पुन्हा याठिकाणी निधी आणि सुविधा यांचा सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न करावा.<br>NMSCDCL ने त्यांची स्वत:ची वेगळी lease line टाकली असल्याचे | |

| अ.क्र. | बैठकीत दिलेल्या सूचना | कार्यवाही करणारे विभाग |
|---|---|---|
| | सांगितले. तथापि, याचा खर्च अत्याधिक असल्यास IP-based CCTV कॅमेरातून थेट video प्रक्षेपण करणे शक्य असल्यास, त्याचाही विचार करावा.<br>सर्व विभागांनी पुरवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची एकूण संख्या विचारात घेऊन, व्याप्तीवर (coverage) परिणाम न होता आणि ओव्हरलॅपिंग कमी करून, शक्य असल्यास कॅमेऱ्यांची संख्या कमी करण्याचा विचार करण्यात यावा. प्रत्येक कॅमेऱ्याची दिशा (त्याचे कोणत्या दिशेला तोंड आहे) ते नकाशावरील संबंधित स्थानावर चिन्हांकित करणे.<br>पोलीस विभागाने त्यांना आवश्यक असलेल्या CCTV कॅमेऱ्यांची आणि इतर तंत्रज्ञानाची गरज (requirement) याचा अभ्यास करून, त्याचे योग्य नियोजन करुन प्रस्ताव सादर करावा.<br>नाशिक स्मार्ट सिटीने सॉफ्टवेअर प्रस्तावित करताना सर्व बाबींचा अभ्यास करुन सर्वसमावेशक व कमी खर्चात उपलब्ध होणाऱ्या सॉफ्टवेअरची निवड करावी.<br>त्र्यंबकेश्वर नगर परिषदेने CCTV खरेदी करण्यासाठी करावयाच्या निविदा प्रक्रियेचा अभ्यास करावा. त्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे नाशिक स्मार्ट सिटी व नाशिक महानगरपालिकेकडून प्राप्त करुन घ्यावीत.<br>CCTV, दुचाकी रुग्णवाहिका व ड्रोन उपकरणाबाबत समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. | |
| 03 | सार्वजनिक बांधकाम विभागाने त्र्यंबकेश्वरला जाण्यासाठी छत्रपती संभाजीनगर, पुणे, मुंबई, धुळे, समृद्धी महामार्ग, इत्यादीकडून तसेच रेल्वेने आलेल्या अभ्यागतांची नाशिक शहरात होणारी संभाव्य गर्दी टाळण्यासाठी नाशिक शहराच्या बाहेरुन (bypass) जाणाऱ्या रस्त्यांचे व वाहनतळांचे पूर्वनियोजनाचे काम लवकरात लवकर सुरु करण्यात यावी. तसेच शहरातील अंतर्गत वाहनतळांची स्थाने निश्चित करण्यात यावीत. समृद्धी महामार्गाचे नाशिक नजीक असणारे exits, नाशिकपासून सोयीच्या अंतरावर असणारी नागपूर/ छत्रपती संभाजीनगरकडून आणि मुंबईकडून येणारी वाहतूक या दोन्ही वाहतुकींसाठी सोयीची असणारी exit points पाहून त्यादृष्टीनेही | सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक, नाशिक महानगरपालिका व नप त्र्यंबकेश्वर |

| अ.क्र. | बैठकीत दिलेल्या सूचना | कार्यवाही करणारे विभाग |
|---|---|---|
| | पार्किंगचा विचार करावा. या सर्व बाबींचा समावेश कुंभमेळा आराखड्यामध्ये करण्यात यावा.<br>सर्व पार्किंगचे यापुढचे नियोजन जसे की पार्किंग layout करणे सुरु करावे. | |
| 04 | सर्व विभागांनी कुंभमेळा आराखड्यात प्रस्तावित केलेल्या कामांमधून, ज्या कामांसाठी त्यांच्या विभागाची योजना उपलब्ध आहे, अशा कामांची यादी पुढील बैठकीत द्यावी. जेणेकरुन कुंभमेळ्यासाठी करावयाची काही कामे कुंभमेळा आराखड्याऐवजी त्या संबंधित विभागाच्या उपलब्ध योजनांद्वारे केली जाऊ शकतील. म्हणजेच नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे कुंभमेळा जर नसता तर एरवी कोणती कामे करणे शक्य होते अशा कामांची यादी सादर करावयाची आहे. यात नाशिक शहरात निर्माण होऊ शकणाऱ्या मोठ्या पायाभूत सुविधा याचा प्राधान्याने विचार करावा. | जिल्हाधिकारी, नाशिक व इतर सर्व विभाग |
| 05 | प्रत्येक विभागाने याशिवाय जागतिक स्तरावरील best practises चा विचार करून कोणते प्रकल्प प्रस्तावित करता येतील याचा विचार करावा. उदा.- नाशिक शहरात अनेक छोटे-छोटे बसस्थानके आहेत. शहराचा व्याप, नागरिकांची सुविधा आणि विभागांची अधिक कार्यक्षमतेने सार्वजनिक परिवहन योजना राबविण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि नाशिक शहर बससेवा या दोहोंसाठीही (Citylink) एक मध्यवर्ती बसस्थानक करता येईल काय किंवा नाशिक रोड रेल्वे स्टेशनचा पुनर्विकास होत असताना त्याच ठिकाणी Integrated Multimodal Transport Hub करता येईल काय अशाही बाबींचा विचार व्हावा. अशा प्रकारचाच विचार इतर विभागांनी करावा. | जिल्हाधिकारी, नाशिक व इतर सर्व विभाग |

याशिवाय इतरही सूचना देण्यात आल्या, व त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देवून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक समाप्त झाल्याचे जाहीर करण्यात आले.

Signed by
Praveen Nilkanthrao Gedam
Date: 29-12-2024 17:58:04
(डॉ. प्रवीण गेडाम)
विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष,
जिल्हास्तरीय सिंहस्थ कुंभमेळा कार्यकारी समिती,
नाशिक

## बैठकीस उपस्थितांची यादी

| अ.क्र. | नाव | पदनाम आणि कार्यालयाचे नाव |
|---|---|---|
| 1 | श्री. जलज शर्मा | जिल्हाधिकारी, नाशिक |
| 2 | श्री. ओमकार पवार | उपविभागीय अधिकारी, इगतपूरी, त्र्यंबकेश्वर |
| 3 | श्री. अर्पित चव्हाण | उपविभागीय अधिकारी, नाशिक |
| 4 | श्री. प्रदीप चौधरी | अपर आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक |
| 5 | श्रीमती स्मिता झगडे | अपर आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक |
| 6 | श्री. योगेंद्र चौधरी | उपआयुक्त (नियोजन), नाशिक विभाग, नाशिक |
| 7 | डॉ. चारूदत्त शिंदे | जिल्हा शल्यचिकित्सक, नाशिक |
| 8 | श्रीमती वर्षा अहीरे- पवार | अधीक्षक अभियंता, MSRTC, नाशिक |
| 9 | श्री. चंद्रकांत खांडवी | पोलीस उपआयुक्त, नाशिक शहर |
| 10 | श्री. राजेंद्र वाघ | निवासी उपजिल्हाधिकारी, नाशिक |
| 11 | श्री. दिपक वराडे | उपसंचालक, NMRDA, नाशिक |
| 12 | श्री उदय पालवे | कार्यकारी अभियंता, सा.बां.वि., नाशिक |
| 13 | श्री अरुण सिया | विभागीय नियंत्रक MSRTC, नाशिक |
| 14 | श्रीमती रंजना दळवी | कार्यकारी अभियंता, MSRTC, नाशिक |
| 15 | श्री. सुमंत मोरे | मुख्य कार्यकारी अधिकारी, NMSCDCL |
| 16 | श्रीमती श्रीया देवचके | मुख्याधिकारी, नगर परिषद, त्र्यंबकेश्वर |
| 17 | व्हीधुमाळ .व्ही . | संवर्धन सहाय्यक |
| 18 | श्रीसिंग .जे .जे . | LSPL, त्र्यंबकेश्वर |
| 19 | जीभोसले .एन . | उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, (विद्युत) |
| 20 | श्रीपीयूष रंजन . | NMSCDCL |
| 21 | पूर्वा माळी | कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, त्र्यंबक नगरपरिषद |
| 22 | स्वप्निल काकड | अभियंता, त्र्यंबकेश्वर नगरपरिषद |
| 23 | वैभव घुगे | अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, त्र्यंबकेश्वर |
| 24 | करण पाटील | कनिष्ठ अभियंता, सिव्हिल, त्र्यंबक नगरपरिषद |
| 25 | केधऊईत .डी . | AEE |
| 26 | योगेश सोमवंशी | स.सं.अ., नियोजन शाखा, वि.आ.का., नाशिक |
| 27 | सीवाडे .पी . | कार्यकारी अभियंता, नाशिक U-I, महावितरण |
| 28 | एनकाळे .टी . | कार्यकारी अभियंता, नाशिक सर्कल |
| 29 | जेजाधव .डी . | कार्यकारी अभियंता, नाशिक U-II, महावितरण |
| 30 | विजय एफशिंदे . | पोलीस निरीक्षक, नाशिक ग्रामीण |
| 31 | योगेश्वर आर. पाटील | उपअभियंता, महावितरण, नाशिक |
| 32 | एच. एच. महाले | सहाय्यक पोलीस निरीक्षक, नाशिक |
| 33 | प्राची देशमुख | EY |
| 34 | निशांत भटनागर | नाशिक महानगरपालिका |
| 35 | पंकज चौधरी | सहायक अभियंता, महावितरण |
| 36 | कल्पेश पाटील | ADTP, नाशिक महानगरपालिका |
| 37 | प्रशांत शेटे | नाशिक महानगरपालिका |

| अ.क्र. | नाव | पदनाम आणि कार्यालयाचे नाव |
|---|---|---|
| 38 | डॉ. तानाजी चव्हाण | MDH, नाशिक महानगरपालिका |
| 39 | संदेश शिंदे | कार्यकारी अभियंता, नाशिक महानगरपालिका |
| 40 | सचिन जाधव | कार्यकारी अभियंता, नाशिक महानगरपालिका |
| 41 | डॉ. नितीन रवटे | आरएमओ, नाशिक महानगरपालिका |
| 42 | संजय अग्रवाल | सिटी अभियंता, नाशिक महानगरपालिका |
| 43 | प्रशांत खैरनार | ACE West Nashik ct |
| 44 | अरुण सिया | DC, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ |
| 45 | डॉ. योगेश बी. चिट्टे | ADH (M) |
| 46 | अनिल ताडकोल | महाव्यवस्थापक, आयटी, NMSCDCL |